**सं.फौ.के. नं. ७७/२०२०**

**नि. क्र. १२ लगत**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०१ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**माझे नाव –** सलिम इमाम नावलेकर,

**वय –** ४२ **वर्षे, व्यवसाय –** चालक,

**राहणार –** मु. पो. नांदगांव, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग.

**<u>सरकारतर्फे सरतपास सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. आर. वनकर यांचेकडून –</u>**

०१. टेम्पा क्र. एमएच–०७–ए.जे. –११६४ हा माझ्या मालकीचा आहे. अभिजीत चव्हाण हा माझ्या टेम्पोवर क्लीनर म्हणून काम करतो. दिनांक ३१/०५/२०१९ रोजी आम्ही आमची ती गाडी घेऊन संध्याकाळी ०५.०० वाजता मुंबईहून निघालो. त्यावेळी गाडीत मी व अभिजीत चव्हाण असे होतो. आम्ही मुंबईहून पाचल, ता. राजापूर जि. रत्नागिरी येथे येत होतो. दिनांक ०१/०६/२०१९ रोजी पहाटे ०३.३० वाजता मुंबई–गोवा महामार्गावरील तळेकांटे या गावाजवळ आम्ही आलो. त्यावेळी मी आमची गाडी चालवित होतो. त्यावेळी समोरुन एक ४०७ टेम्पो आला. त्या समोरच्या टेम्पोचे लाईट डोळयावर खूप चमकले. तो टेम्पो सरळ येऊन आमच्या गाडीवर आदळला. मला त्या गाडीचा नंबर आठवत नाही. ती धडक झाल्यामुळे, समोरच्या गाडीत पॅसेंजर होते त्यांना दुखापत झाली होती. तसेच त्या गाडीच्या चालकाला मार लागला होता. त्याचप्रमाणे मला व माझा क्लीनर अभिजीत चव्हाण असे आम्हा दोघांनाही आमच्या उजव्या पायाला मार लागला होता. मला मुक्कामार होता. मी तेथेच खाजगी दवाखान्यात उपचार घेतला. समोरील गाडीतील चालक, प्रवासी व माझ्या गाडीतील क्लीनर अभिजीत यांना उपचारकामी सिव्हील हॉस्पीटल, रत्नागिरी येथे नेले होते. मी या अपघाबाबत पोलीस ठाणे देवरुख येथे तक्रार दिली. मला आता दाखविणेत आलेला दस्त म्हणजे मी दिलेली फिर्याद आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे (सदर फिर्यादला **<u>निशाणी १७</u>** देणेत आली). मी त्या समोरील गाडीच्या चालकाला पाहिले होते. तो आज न्यायालयात हजर नाही. त्याचे नाव मोअज्जम साटविलकर असल्याचे मला समजले (निशाणी १५ कडील आदेशान्वये आरोपीची आज रोजीची हजेरी माफ करणेत आलेली आहे).

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जी. आर. गानू यांचेकडून –</u>**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०१/०६/२०१९ रोजी पाऊस पडलेला होता. घटनास्थळी वळण आहे, या तुमचे सुचनेबाबत माझे सांगणे की, हलकेसे वळण आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी राजापूरकडे जाताना उतार आहे.

०३. ''आमची गाडी मी चालवित होतो'' हा मजकूर मी फिर्याद देताना सांगितला होता. तसा मजकूर फिर्यादमध्ये का नमूद नाही, याचे काही कारण मला सांगता येणार नाही.

०४. हे म्हणणे खरे नाही की, अभिजीत चव्हाण याचेकडे वाहन चालविणेचा परवाना नाही. हे म्हणणे खरे आहे की, या घटनेसंदर्भात नुकसान भरपाई मिळावी म्हणून मी अन्य न्यायालयात प्रकरण दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळेच समोरुन खूप लाईट चमकले, असे मी खोटेच सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला समोरच्या गाडीचा नंबर पोलीसांकडून समजला. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपीचे नाव पोलीसांकडून समजले. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अपघात आमचे गाडीचे चुकीमुळे झाला. हे म्हणणे खरे नाही की, समोरील गाडीचा चालक दुखापतग्रस्त अवस्थेत दवाखान्यात गेल्यामुळे त्याचा गैरफायदा घेऊन मी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, समोरील गाडी चालकाला व इतर लोकांना नुकसान भरपाई दयावी लागू नये यासाठी मी खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, आमची गाडी आमच्या गाडीच्या चालकाच्या झोपेमुळे आदळली. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

BALIRAM DATTATRAYA TARE

Digitally signed by BALIRAM DATTATRAYA TARE
Date: 2023.04.30 14:51:06 +0530

(ब. द. तारे)

दिनांक १७/०४/२०२३

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

Judgment/order/evidence S.C.C. No. 77/2020)

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. S. Thaware (Jr. Clerk) |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of evidence | :- | 17/04/2023 |
| evidence signed by PO. on | :- | 17/04/2023 |
| evidence uploaded on | :- | 30/04/2023 |